वर्ष २२
अंक ३ रा
१५ सप्टंबर १९४८

# समाजस्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम्. ए.

किंमत ४ आणे

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | ब्रह्मचर्याचे दुष्परिणाम-२ ... ... ... | ४९ |
| २. | असोशी ... ... ... ... | ५४ |
| ३. | गर्भपाताविषयीं विक्षिप्त मतें ... ... ... | ६० |
| ४. | पत्रव्यवहार ... ... ... ... | ६३ |
| ५. | शारदेचें पत्र ... ... ... ... | ६६ |
| ६. | जर्मनींत गर्भपाताची भयंकर वाढ ... ... | ७१ |



## अजंटांचीं नांवें

मुंबई : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

पुणें : अल्. के. जोशी, बुकसेलर
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

कोल्हापूरः स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल.

बेळगांवः जे. एम. माणूरकर, खडे बाजार.

अहमदनगरः पी जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

निपाणी : के. एस्. बळगुर्गी

कुमठा : आर्. एम्. कामत

नागपूर सी. सी. ताठे, नवयुग न्यूज अेजन्सी.

गोकाक : पी. एम्. शिरगांवकर

सावंतवाडी : विनायक के. वाडकर.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# ब्रह्मचर्याचे दुष्परिणाम–२

या बाबतींत इंग्रजांच्या मनोवृत्तीचा वेगळा विचार करणें जरूर आहे, कारण तिचा परिणाम आपल्यावरही झालेला आहे, आणि तो फक्त इंग्रजी पोषाखांत मिरवणाऱ्या तरुणांवरच नव्हे, तर भस्म लावणाऱ्या जळजळीत सनातन्यांवरही झालेला आहे. मनोविश्लेषणतज्ञांचेंही लक्ष अिंग्रजांकडे विशेषतः वेधलें गेलें, कारण त्यांची मनोवृत्ति यूरोपांत देखील अितरत्र सांपडत नाहीं. तथाकथित विनयाचा तेथे अतिरेक झालेला आहे. व्हिक्टोरियाच्या राज्यांत तर त्याला सीमा राहिली नव्हती. प्रख्यात लेखक आर्. अेल्. स्टीव्हनसन यानें म्हटलें आहे कीं फ्रेंच लेखकांना जसें पाहिजे त्या विषयावर मोकळेपणानें लिहितां येतें, तसें अिंग्रज लेखकांना लिहितां येत नाही हें दुर्दैव आहे.

अिंग्रजांच्या फाजील विनयाची कल्पना येण्याकरतां अेका फ्रेंच लेखकाने आपला अनुभव दिला आहे की तो अिंग्लंडांत अेका स्नेह्याकडे उतरला असतां सकाळचे वेळीं त्या स्नेह्याची मुलगी त्याला जिन्यांत भेटली, तेव्हां तिनें त्याला ओळखच दिली नाही, कारण त्याचा पोषाख जरी बहुतेक पुरा झाला होता, तरी गळपट्टी बांधायची राहिली होती. यामुळे ती त्याला नग्नच समजत होती. ती बांधल्यानंतर ती पुन्हा भेटली, तेव्हां जणूं काय प्रथमच भेटल्याप्रमाणें ती 'गुड मॉर्निंग' म्हणाली. बायकांच्या झग्यांनी रस्त्यांतील धूळ झाडलीच पाहिजे असा जणूं काय नियमच होता,

कारण ते किंचित् आंखूड केल्यास स्त्रियांना पाय असतात हें कोणाला कळेल ! त्यावेळीं पाय अश्लील होते. हल्लींच्या झग्यांवरून त्यांची कल्पना येणार नाही, कारण ते जेमतेम गुडघ्यापर्यंत पोंचतात, यामुळें मांड्याही अेखादे वेळीं दिसल्या तरी चालतात. त्या काळीं विजार हा शब्द देखील अश्लील झाला होता आणि ‘ माझी विजार कोठें आहे ’ असें विचारणें झाल्यास, ‘ ज्याचें नांव घ्यायचें नाही तें माझें वस्त्र ( अन्‌मेशनेबल्स ) कोठें आहे ? ’ असें म्हणावें लागत असे. याचाच परिणाम म्हणून पुण्यांतील अेका शाळेंत शिवणकामाच्या परीक्षेंत, ‘ विजार ढुंगणावर फाटल्यास कशी दुरुस्त करावी ? ’ असे सरळ विचारण्याअैवजीं, ‘ बसलें असतां जो भाग बैठकीला लागतो, तेथें विजार फाटल्यास कशी दुरुस्त करावी ? ’ असा प्रश्न विचारला होता. ही गोष्ट वाचून हंसूं येतें, पण या वृत्तीचे परिणाम मात्र भयंकर होतात आणि अशा देशांत मानसिक रोगांचें प्रमाण अतिशय वाढलेलें असतें असा मनोविश्लेषणतज्ञांचा अनुभव आहे.

अमेरिकेंतली बरीचशी वस्ती अिंग्रजांचीच आहे, यामुळे तेथेही ही वृत्ति बरीच फैलावलेली आहे. तेथे विवाहबाह्य समागमावर कडक नियंत्रण असतें आणि याच्याच परिणामीं तेथे सोडलग्नाचा कायदा अतिशय सोपा आणि सैल झालेला आहे. दडपण फाजील झालें म्हणजे कांहीतरी पळवाट ठेवावीच लागते, कारण न ठेवल्यास अेकदम मोठा स्फोट होऊन सर्वनाश होण्याचा संभव असतो. अेका फ्रेंच प्रवाशानें १९२७ सालीं अमेरिकेंतल्या प्रवासाचें वर्णन दिलें आहे की तेथे ‘ हॉटेलांतल्या खोलींत टेबलावर आपल्याला प्रामुख्यानें दोन गोष्टी दिसतात, अेक उघडें बायबल आणि अेक चड्डी. याचा अर्थ असा की दररोज बायबल वाचावें आणि खोलींत शरीराची निगा राखण्याकरतां देखील नग्न राहूं नये. मी तें बायबल मिटून ठेवलें आणि चड्डी केराच्या टोपलींत टाकली. ’ काय म्हणावें या फ्रेंच लोकांना ! कोणाला या गोष्टींचें महत्व वाढणार नाही, पण मनोविश्लेषणाच्या दृष्टीनें त्यांना महत्व आहे. शिवाय अेक बायबल आणि अेक चड्डी या दोन

वस्तूंचा संबंधही लक्षांत घेण्यासारखा आहे. धार्मिक वृत्तीचा कामवासनेशीं संबंध किती निकट आहे हें यावरून समजतें आणि या सोंवळ्या लोकांच्या मनांत अेकसारख्या कोणत्या कल्पना घोळत असतात हें स्पष्ट होतें. कांही लोकांना कामवासना पूर्ण करण्याची जितकी हांव असते, तितकीच हांव या लोकांना कामवासनेच्या मार्गांत अडथळे आणण्याची असते. म्हणजे दोघांच्याही मनांत अेकाच प्रकारचे विचार वास करीत असतात आणि त्यांतच त्यांना आनंद वाटतो. जज्ज लिंडसे म्हणतात की अमेरिकन लोकांवरील सर्वांत मोठी आपत्ति ही होय.

अशा रीतीने जनतेला लहान मुलांसारखें वागवल्याने लोक सुखी झाले असते, तर या पद्धतीचें कांही समर्थन करतां आलें असतें, परंतु तसें दिसत नाही. अमेरिकेंत मानसिक रोगांचा फैलाव यूरोपपेक्षां पुष्कळच अधिक आहे. पुष्कळ श्रीमंत अमेरिकन लोक नेहमी यूरोपांत येत असतात, त्याचें अेक मुख्य कारण म्हणजे कामविषयक बाबतींतील स्वातंत्र्य हें होय. तें अिंग्लंडांत जरी फारसें नसलें तरी यूरोपांतील अितर देशांत बरेंच आहे.

मध्ययुगांत व त्यानंतरही यूरोपांत क्रिस्ती धर्माचा पगडा अबाधित होता, पण सोळाव्या आणि सतराव्या शतकांत धर्माचा फोलपणा कित्येक बंडखोरांनी सिद्ध केला आणि अठराव्या शतकांत धर्माचें माहात्म्य बरेंच कमी झालें. पण तरीदेखील कामवासनेच्या बाबतींत लोक जुन्या धार्मिक मतालाच चिकटून राहिले, कारण धर्माच्या आधारावरच कायदे झाले होते आणि नीतीच्या कल्पनाही कायद्याला धरूनच होत्या. या पुराण्या कल्पनांवर फ्रॉअिडनें मोठा हल्ला चढवला, पण चालू नीतीविरुद्ध लिहिण्याची त्याचीहि छाती झाली नाही. यानंतर धार्मिक लोकांनी आपला पवित्रा बदलला. विवाहबाह्य समागम हें पाप नसलें तरी त्याचे परिणाम वाअीट होतात हें ढोंग पुढें आलें. अनौरस मुलें, गुप्त रोग, वगैरे परिणामांवर जोर देऊन क्लीबनीतीचें समर्थन होऊं लागलें. तरीपण विचारी माणसांना अेवढ्याने समाधान वाटेना.

याकरतां अेक नवीनच उपाय अिंग्लंडमध्यें निघाला. कामवासनेकडून

मनुष्याचें मन दुसरीकडे वळवलें पाहिजे, या हेतूने व्यायामाच्या खेळांचा बडेजाव होऊं लागला, विद्यार्थी फाजील व्यायामानें थकून गेले म्हणजे त्यांना कामवासनेची आठवण देखील होणार नाही, ही कल्पना याच्या मुळाशीं होती. क्रिकेट, फुटबॉल, वगैरे खेळांत प्रावीण्य मिळवणें, उच्चांक गांठणें, हीं अिंग्लंडांत मोठीं महत्वाचीं ध्येयें होऊन बसलीं. जणूं काय आयुष्यांतल्या अत्यंत महत्वाच्या गोष्टी म्हणजे हे खेळ! या खेळांनी मेंदूवर ताण न पडतां स्नायु मात्र थकतात आणि अिंग्लंडचें वर्चस्व असलेल्या सर्व देशांत या खेळांना फाजील महत्व मिळालें. स्त्रिया देखील त्यांतून सुटल्या नाहींत आणि शिवाय स्त्रिया पुरुषांच्या सर्व धंद्यांत शिरल्या. ज्या देशांत कामवासनेवर बहिष्कार नाही, त्या देशांत स्त्रिया या भानगडींत पडत नाहींत. फ्रान्समध्यें स्त्रिया मतांकरितां भांडल्या नाहीत किंवा डाक्तर आणि वकीलही फारशा होत नाहीत, याचें हें अेक मुख्य कारण आहे.

अमेरिकेंतही अिंग्लंडसारखीच स्थिती आहे. तेथे क्रिकेटची जागा बेसबॉलने घेतली आहे आणि या व्यायामाच्या खेळांना उत्तेजन देऊन पुढील पिढी अप्रतिम करण्याचा अमेरिकनांचा बेत आहे, पण त्यांच्या डाक्तरांचा मात्र याला पाठिंबा नाही. मानसिक रोगांचा प्रसार अमेरिकेअितका कोठेच नाही. अशा रोगांवर औषधांच्या जाहिराती तेथे सर्वत्र दिसतात. पॉल रेनो यांजजवळ न्यू ऑर्लीन्स मधील अेका डाक्तरानें बोलून दाखविलें की अमेरिकेंत बरेच पुरुष ४० ते ४५ वयाला नपुंसक होतात. डॉ. रॉबिनसन यांनी नपुंसकांचें प्रमाण शेंकडा ७५ दिलें आहे. म्हणजे अितके लोक जरी सर्वस्वी नपुंसक नसले, तरी त्यांची कामशक्ति अत्यंत कमी असते. कामवासनेला पूर्ण वाव देण्याबद्दल प्रसिद्ध असलेला कॅसानोव्हा हा ९० वर्षें जगला, यावरून अशा वर्तणुकीने प्रकृतीला कोणताही धोका उत्पन्न होत नाही हें उघड आहे. प्रकृतीला धोका बहिष्कारानें उत्पन्न होतो.

वरील बहिष्कारामुळें अमेरिकेंत खाजगी जीवन असें नततेंच. जेथें पहावें तेथें लोकांच्या खाजगी व्यवहारांत सरकारी अधिकाऱ्यांचें नाक खुप-

सलेलें असतें. यामुळें लोकांना जीव नकोसा होऊन रोगांचे तें आणखी अेक कारण होतें. या बहिष्काराच्या वृत्तीमुळेच युरोपांतील बहुतेक देशांत सरकारने वेश्यांविरुद्ध शस्त्र उपसलेलें असतें. त्याचा हेतु हाच की समागम शक्य तितका दुर्मिळ व्हावा. विशेषतः बंदरें असलेल्या अतिपूर्वेकडील शहरांत ही खबरदारी घेतलेली असते की तद्देशीय स्त्रियांचा परकीय पुरुषांशीं संबंध होऊं नये. याचा परिणाम मात्र असा झाला आहे की मध्यस्थांचा धंदा करणारे लोक हल्ली, ‘ छोकरी पाहिजे का ? ’ असें विचारण्याअैवजी, ‘ छोकरा पाहिजे का ? ’ असें विचारतात, कारण त्यांच्यावर सरकारी देखरेख नसते. समागम दुर्मिळ केल्याचा आणखी अेक परिणाम म्हणजे समागमाअैवजी दारू, अफू, कोकेन, वगैरे व्यसनांचा प्रसार अमर्याद वाढला आहे. हेंही चालतें, पण समागम नको, हें क्लीबनीतीचें तत्व आहे. अशा ठिकाणचे लोक नेहमी दुर्मुखलेले असतात असें आढळतें, कारण समागमाची गरज व्हिस्कीने किंवा क्रिकेटने भरून निघत नाही. चीन किंवा जपानमध्यें असे दुर्मुखलेले चेहरे दिसत नाहीत, कारण तेथे ही यूरोपीय वृत्ति अजून फारशी पसरलेली नाही.

जेथे जेथे यूरोपीयांनी वसाहती स्थापल्या, तेथील मूळच्या रहिवाश्यांचा या वृत्तीमुळे नाश झालेला आहे. आर्. अेल्. स्टीव्हनसन याने लिहिलें आहे की दीडशें वर्षांपासून या क्लीबनीतीच्या तडाख्यांत सांपडल्यामुळे ओशिआनियामधील लोक नाहीसे होण्याच्या मार्गावर आहेत. यूरोपीयांचा संसर्ग होण्यापूर्वी त्या लोकांत धार्मिक वेडगळ समजुती कितीहि असल्या तरी समागमाला बंदी नसे. यामुळे ते लोक आनंदा असत आणि त्यांचे पोषाख, गायन, नृत्य, वगैरेचा याला पुरावा आहे. हवाअी बेटांतील लोक पूर्वी आनंदी म्हणून प्रसिद्ध होते, तेही आतां दुःखी दिसतात. जीवनांतील आनंद नाहीसा झाला म्हणजे जगायचें तरी कशाला, अशी वृत्ति उत्पन्न होते. या प्रदेशांत सर्वत्र असें आढळतें की जेथे जेथे मिशनऱ्यांनी धुमाकूळ माजवून त्या सुस्वभावी लोकांवर हुकूम चालवला, तेथे तेथे त्यांचा



2

नाश होत आहे. यूरोपांतले धर्मपंथ तेथेही दुही किंवा तिही माजवीत आहेत आणि नसतीं भांडणें उत्पन्न करीत आहेत. मार्कीज बेटांत पूर्वी तद्देशीयांची वस्ती ( १८५० मध्यें ) तीस हजार होती, तेथे आज तीन हजार देखील नाही. पोषाखांत आणि चालीरीतींत यूरोपीयांनी ढवळाढवळ केल्यामुळे क्षय आणि गर्मी यांचा प्रसार होऊन लोक भराभर मरतात. त्यांना भलताच पोषाख घालायला लावल्यानें क्षयाला मदत होते. यूरोपीयांच्या वसाहतींत हा परिणाम नेहमी आढळतो. भलत्याच कल्पना लोकांच्या माथीं मारल्याने लोक मरतात. पण कदाचित् यूरोपीयांचा उद्देशच तसा असेल ! त्यांना जागा पुरत नाही, तेव्हां अमेरिकेंत जसे तद्देशीय लोक नाहीसे झाले, तसेंच सर्वत्र झालें तर त्यांचा फायदाच आहे.

---

# असोशी

लेखक, **मनोहर हासूजी डफळे**

मी वकील झालों, चार पैसे मिळवूं लागलों. मी मुंबईस गिरगांवांत रहात होतों. कमवायला लागल्याबरोबर लग्न करायचें, हा माझा निश्चय मी पाळला होता आणि त्याप्रमाणें मी अडीच वर्षांपूर्वी विवाहबद्ध झालों होतों.

माझ्या पत्नीच्या माहेरगांवांतील शेजारच्या अेका गृहस्थाची मुलगी उपवर झाली होती. ते गृहस्थ व्यसनी होते, त्यामुळें त्या मुलीच्या आअीनें तिच्या कन्येचें लग्न मी कोठेतरी जमवून द्यावें म्हणून माझ्या पत्नीमार्फत माझ्याकडे रदबदली केली होती. विभावरी दिसायला चांगली नीटस, सर्व बाजूंनीं सुरेख तरुणी होती, नि माझा मुंबअीचा मित्रपरिवार मोठा होता, हें लक्षांत घेऊन मीं तिचें लग्न कोठेतरी जमवून देअीन अशी मला खात्री वाटत होती.

विभावरीला ‘ पाहण्यासाठीं ’ येणाऱ्या प्रत्येक माणसाला अितक्या दूरच्या गांवीं जातां येणें शक्य नव्हतें. म्हणून, तूर्त कांहीं दिवसांच्या बोलीनें मी तिला तिच्या मातापित्यांच्या संमतीनें मुंबईला आपल्या घरीं आणून ठेवली. ती रिकामटेकडीही राहूं नये, म्हणून मी तिला नर्सिंगचें शिक्षण घेण्याचा आग्रह केला. ती त्याप्रमाणें कामावर जाऊं लागली.

हळूहळू मला भेटायला येणाऱ्या माझ्या सासुरवाडीच्या लोकांनीं मला विभावरीची माहिती दिली. तेथे ती शिकत असतांना तिच्या हातून घडूं नये तो प्रकार घडला, म्हणूनच तिच्या लग्नाला अितका विलंब लागला होता, नि तिचें लग्न कोठें विनासायास जमलें तर तें मुंबईसच जमेल, असें तिच्या आअीबापांना वाटणें साहजिक होतें. विभावरी सध्यां तरी फुलपांखरासारखी आनंदांत होती. तिचें नर्सिंगचें शिक्षण चालू होतें.

अिकडे मी दोनतीन विवाहसंस्थांतर्फे तिला चांगला वर मिळावा असे प्रयत्न चालवले. चारपांच तरुणांनीं तिला ‘पाहिलें’, त्यांना ती पसंत पडली, पण तिला त्यांपैकीं अेकही पसंत पडला नाहीं. अशा रीतीने दीड वर्षाचा काळ कसा निघून गेला हें मला कळलें नाहीं. नंतर मात्र मी जागा झालों. तिला पसंत नसलेल्या एखाद्या तरुणाशीं तिला विवाह करण्यास भाग पाडणें मला योग्य वाटलें नाहीं, म्हणून मी तिचा विवाह जमवूं शकलों नव्हतों.

पण अेके दिवशीं माझी संमति नसतांना तिने माझें घर सोडलें. तिनेंच आपला प्रियकर शोधून काढला होता असें नंतर मला समजलें. झाल्या प्रकाराबद्दल मला विषाद वाटत असे, मन हवालदिल होअी. मी अशा अस्थिर मनःस्थितींत असतांना माझा बाळमित्र मधुकर मला भेटण्यास आला होता. तो मुंबईला आला कीं माझ्याकडेच उतरत असे. तो पूर्वी आला होता त्यावेळीं विभावरी आमच्याकडे नुकतीच राहण्यास आली होती. त्याला ती आतां दिसली नाहीं, म्हणून त्याने ती कोठे आहे म्हणून मला छेडलें.

" विभावरी नाहीशी होतांच मी तीनचार दिवस तिचा शोध केला. शेवटीं ती अेका गृहस्थाबरोबर अेका हॉटेलांत रहात असल्याचें वृत्त गिरगांव पोलिसांनीं मला कळवलें. तिची विचारपूस करून, तिची समजूत घालून, तिला घरीं आणण्यासाठीं मी त्या हॉटेलांत घाअीघाअीने गेलों होतों, पण कांहीं केलें तरी ती माझ्या घरीं येण्यास तयार होअीना. मी तिच्यासाठीं घेतलेल्या त्रासाची नि काळजीची तिला दिक्कत वाटली नाहीं. " मी मधुकरला हकीकत सांगत होतों.

**मधुकर**-पण ती आली कां नाहीं ?

**मी**-ती त्या गृहस्थाशीं लग्न करणार होती. त्याने तिला वचन दिलें होतें.

**मधुकर**-बरें झालें, तुझ्या मागचा त्रास, धांवधांव चुकली.

**मी**-थांब, पुढें अैक. मी तिच्या इच्छेविरुद्ध घरीं चल म्हणून म्हटलें नसतें. पण तो तिच्याबरोबर असलेला गृहस्थ पाहतांच मला मोठें आश्चर्य वाटलें. तिचा तो प्रियकर तिचा 'रामा' शोभेल असा दिसला. मला त्याचा तो भडक रंगाचा रेघांचा शर्ट, त्याच्या खुजा शरीराला न शोभणारी त्याची खाकी अर्धविजार, त्याचा निर्भाव नि कळकटलेला चेहरा, त्याचा तो काळा वर्ण नि हाडकुळें शरीर, डोळ्यांत दिसून येणारी दारुड्याची धुंदी, वगैरे पाहून माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसला नाहीं. प्रथम तिने त्याच्याशीं लग्न करावें ही कल्पना सहन झाली नाही. मला. तिची अितकी अधोगति कशी झाली हें माझ्या आकलनाच्या बाहेरचें होतें.

**मधुकर**-पण तो होता तरी कोण ?

**मी**-तो गृहस्थ नुकताच डाक्तर झाला होता असें मला विभावरीनेंच सांगितलें. तिच्या अेका नर्स मैत्रिणीनें विभावरीची त्याच्याशीं ओळख करून दिली होती. तो राहतो अंधेरीला, पण पहिले तीनचार दिवस तो हॉटेलांत राहिला होता.

**मधुकर**–काय करतो तो अंधेरीला ?

**मी**–मला नंतर कळलें, त्याची प्रॅक्टिस जेमतेम चालती होती. मला विभावरीच्या निवडीचा भयंकर संताप आला होता. तिला मीं मूर्ख समजून अेकदोन शिव्याही दिल्या, पण माझें कांही चाललें नाही. ती सज्ञान होती, पोलिसांना त्या बाबतींत कांही करतां येण्यासारखें नव्हतें, म्हणून घरी आलों नि तिच्या वडिलांना तार करून बोलावून घेतलें, पण तो भला गृहस्थ आलाच नाही ! पुढें त्या दोघांचें लग्न झालें की नाही हें पण माहीत नाही. पण परवांच मला कळलें, त्यांचें नीटसें जमत नाही, तीं दोघें सुखांत नाहीत." अितकी हकीकत सांगून मी निमूटपणें बसलों.

**मधुकर**–मला वाटतें अशा घटना मुंबईसारख्या शहरांत मामुलीच असतात. म्हणून मी विचारतों, तुला एवढें वाईट कां वाटावें ? तुझी तक्रार काय ?

**मी**–तिच्याकरतां मी किती आपलेपणाने मेहनत घेतली होती, नाही नाही त्या माझ्या परिचितांना मध्यस्थी घालून मी तिच्यासाठीं वरसंशोधन करीत होतों. तिच्या गौरवर्ण उमद्या सौंदर्याला साजेल असा वर तिला मिळावा म्हणून माझी सारी खटपट होती. तिने अितकीं स्थळें नाकारलीं तरीपण मला वाअीट वाटलें नाही, कारण शेवटीं तिच्या संमतीचा प्रश्न होता. तिच्या सुखाचा निर्णय तिनेच घ्यायचा होता. तो तिचा हक्क होय हें ओळखून मी तिच्यावर सक्तीने कांहीच लादूं अिच्छित नव्हतों.

**मधुकर**–बरं मग ?

**मी**–खूप विचार केला मी, पण मला या घडामोडींचा अर्थ लावतां आला नाही. तूं तरी सांग. लेखक आहेस तूं !

**मधुकर**–सांगूं का ? अैकशील ? बरं तर. विभावरीला पुरेसें अन्न, रहायला जागा आणि ती घेत असलेलें नर्सिंगचें शिक्षण, वगैरेंनी तिचें समाधान व्हायला हवें होतें ही तुझी खात्री.

**मी**–तसें कसें ? वेळांत वेळ काढून जवळजवळ सर्व बोलपट तिनें पाहिले. मी तिला हरकत घेत नसें. मी म्हणें बिचारीनें लग्नाच्या आशेने किती दिवस झुरायचें ? म्हणून जरूर त्या सवलती मी तिला देत आलों.

**मधुकर**–तुझें म्हणणें या सर्व गोष्टींनी तिला सुख वाटायला हवें होतें. पण तूं तिला हवेंहवेंसें वाटणारें समाधान तिला देऊं शकला नाहीस.

**मी**–मी दुसरें काय करूं शकणार होतों, मधुकर ? तिच्या लग्नाची सुकरता व्हावी म्हणून तिनें त्या अंतिम सुखासाठी भविष्यांत नजर टाकून प्राप्त परिस्थितींत समाधान मानणें जरूर होतें.

**मधुकर**–तें खरें, पण तिला तसें वाटलें नाही ना ?

**मी**–पण कां ? याचें काय कारण असावें ?

**मधुकर**-खरें सांगूं, रागावणार नाहीस ना ? ठीक आहे. ती सुंदर विभावरी तुला आवडत होती हें कबूल करशील का ? नाही म्हणून कसें चालेल ? नाहीतर तुला अितकें वाअीट वाटण्याचें कारण काय दुसरें ? अैक, पुढें अैक. तिच्या आकर्षणाला तूं बळी पडला होतास, म्हणून आपली फसवणूक करून घेऊन, तिचें भलें व्हावें अशा उपरी भावनेचें वेष्टण घेऊन तूं तिच्याशीं वागत होतास. पितृत्वाचा बुरखा घेऊन तूं तिला वागवलीस. तुझें मन स्वस्थ रहात नसावें. तें तिच्या सौंदर्याकडे खेंचलें जाअी, आणि तूं तिच्यांबरोबर कधीही सिनेमाला जात नाहीस असें मला पत्रांतून कळवलें होतेंस, त्याचा अर्थ मी बरोबर लावला होता. तुझा तोल सुटेल अशी भीति तुला वाटत होती, यांत मला तर शंका नाही.

**मी**–माझ्या घरीं विभावरी रहात होती, या परिस्थितीचा लोकांनी विपर्यास करूं नये हा माझा हेतु होता, मधुकर !

**मधुकर**– होय, तेंच तर मी सांगतों आहें. अशा अेखाद्या दुर्बल क्षणाला तूं विचलित होशील, अशी तुला धास्ती वाटली की नाही ?

**मी**-होय, हें मी कबूल करतों. पण माणसाने मन नको का ताब्यांत ठेवायला ?

**मधुकर**-सोड त्या हजार बाता. अितका कसा रे अजागळ तूं ? ती तुझ्या घरांत असतांना तिच्या प्राप्तीविषयीं तुलां तळमळ वाटण्याचें कारण काय ?

**मी**-काय म्हणतोस तूं हें, मधुकर ! शक्य तरी होती का असली गोष्ट ? विभावरीला पूर्वी अेका तरुणाने पुरें फसविल्यामुळें तिला भलतेंच करून मोकळें व्हावें लागलें होतें, म्हणून तिचे लग्न जमेना, तें लांबणीवर पडलें. ही गोष्ट तिच्या मनांतून नाहीशी होण्यासारखी होती का ? म्हणून सारेच पुरुष तरुण कुमारिकांना फसवणारे नसतात, हें मी तिला माझ्या संयमाने दाखवणें जरूर होतें. त्या योगानें तिचा जगावरचा डळमळणारा विश्वास नि नैराश्य नाहींसें होऊन ती ध्येयवादाने जगाच्या भलेपणाकडे दृष्टि ठेवून आपल्या पुढील आयुष्याकडे आशेने पाहील असें मला वाटलें होतें. यांत चुकलें कोठें ?

**मधुकर**-तें ठीक आहे रे, पण तिच्या बाबतींत तुझ्या होरा चुकला. हें पहा, तो अंधेरीचा डाक्तर तिने पसंत केला याचें तुला आश्चर्य वाटतें, नाही का ? त्यापेक्षा तूं काय कमी होतास ? तूं आपली असोशी पुरी करूं शकला असतास नि तिच्या ठिकाणीं बाहेर शोधाशोध करण्याचा असा बेछूटपणा येता ना. ती तुझ्याशीं निराळ्या वृत्तीने वागली असती. तिला कोणीतरी पुरुष हवा होता. तुला खात्रीने तिने नाकारणें शक्य नव्हतें आणि मुंबअींत भेटणाऱ्या अशा मायावी माणसाच्या आहारीं जाण्याअितकी धुंदी तिला चढली नसती.

**मी**-मला नाही वाटत तसें.

**मधुकर**-तुला समजत नाही तें हेंच. तुम्ही वकील उगाच तर्क करीत बततां. अरे बाबा, मनस्तृप्तीच्या दीर्घकालीन उपासामुळे अधाशी झालेल्या विभावरीला हवेंहवेंसें वाटणारें जर तूं पुरवतास, तर ती अितकी वखवखती

ना. मग तिच्या हातून अशी घिसाडघाई झाली नसती नि तिला सावकाशीने तुझ्याच पसंतीप्रमाणें उत्तम वर संपादन करतां आला असता. तुझ्या अशा डोळस सहकार्याने ती तुझें ऐकत आली असती नि ती जास्तींत जास्त सुखी झाली असती असें नाही वाटत तुला?

**मी**–झाली असती, पण तो मार्ग ......

**मधुकर**–मार्गाचें जाऊंदे. संधि गेल्यावर आटापिटा करण्याने कांही साधणार नाही आतां. पण नशीब समज, ती त्या अंधेरीच्या काळ्या माणसाकडे तरी गेली. निदान तो डाक्तर तरी आहे. ती तुझ्या घरांतल्या रामाबरोबर पळून गेली नाही.

**मी**–चूप बैस, मधुकर. त्याचे कान चांगले तिखट आहेत. ऐकेल ना तो, तुला ताळ नाही तंत्र!

मधुकर तेथे काम करीत असलेल्या माझ्या नोकराकडे टक लावून बराच वेळ बघत बसला होता. काय त्याला वाटलें कोणास ठाऊक?

---

# गर्भपाताविषयीं विक्षिप्त मतें

धर्मालाच नीति समजणारे लोक पुष्कळच असतात. क्रिस्ती धर्मांतील कॅथोलिक पंथाच्या लोकांचीं मतें पुढें दिलीं आहेत, त्यांत नीति कितपत आहे हें ज्याचें त्याने ठरवावें. हा उतारा अेका अमेरिकन वृत्तपत्रांतील लेखाचा आहे.

“ कोणीही अमेरिकन स्त्री असें गृहीत धरून चालते की बाळंतपणाचे वेळीं तिचा डाक्तर तिचा जीव वांचवण्याचा शक्य तो प्रयत्न करील, आणि निदान शेंकडा ९९ अमेरिकन नवऱ्यांना जर असा प्रश्न विचारला की स्त्री किंवा मूल यांपैकी अेकाचाच जीव वांचवणें शक्य असलें तर कोणाचा वांचवावा, तर ते मुलापेक्षा स्त्रीचाच जीव वांचवणें पसंत करतील.

पण कॅथोलिक धर्मांची शिकवण अशी नाही, अितकेंच नव्हे तर यांत कॅथोलिक डाक्तर नवऱ्याचें मत विचारणार देखील नाही. पोप सहावा पायस याने असा फर्मान काढला आहे की दोन्ही जीवांची किंमत सारखीच आहे आणि त्यांपैकीं अेकही मरूं देण्याचा अधिकार कोणालाही नाहीं. या बाबतींत फादर डेव्हिस यांनी लिहिलें आहे की डाक्तरांपुढे हा विकट प्रश्न पुष्कळ वेळां येतो. पुष्कळ वेळां वैद्यकीय पुस्तकांत असें मत दिलेलें असतें की दोन्ही वांचणें शक्य नसेल तर आअीला वांचवावी आणि मुलाला मरूं द्यावें. पण कॅथोलिक डाक्तरानें असें न करतां निघून जावें, कारण त्याला कोण-ताही जीव मारतां येत नाहीं आणि आअीला वांचवण्याकरतांही त्याने गर्भ-पात करतां नये असा धार्मिक दंडक आहे. आणखी अेका लेखकाने या मताला पोषक तत्वज्ञान असें दिलें आहे की कांही गुन्हा केलेला असल्या-शिवाय कोणताही जीव मारण्याचा अधिकार अीश्वराशिवाय कोणालाही नाही ( गुन्ह्याने तरी हा अधिकार कसा उत्पन्न होतो हें त्यानें सांगितलें नाहीं ). मातेचें मातृत्व हें केवळ आगंतुक आहे, त्यामुळें तिच्या जिवाची किंमत मुलाच्या जिवापेक्षां जास्त ठरत नाही. जगांतील सर्व मातांचे जीव वांचव-ण्याकरतां देखील अेक तास वयाच्या मुलालाही मारण्याचा अधिकार कोणाला पोंचत नाही.

पण कॅथोलिक माता आतां या तत्वज्ञानाविरुद्ध बंड करीत आहेत आणि अेका पाद्र्याने तरुण कॅथोलिक मातांच्या सभेंत हें मत प्रतिपादलें असतां त्यांनी संतापून त्याला प्रश्नांनी अितकें बेजार केलें की ती सभा पुढें चालवणें अशक्य झालें.

कॅथोलिक पंथाला मुलाच्या आत्म्याची मोठी काळजी वाटते. आअीचा बाप्तिस्मा पूर्वीच झालेला असल्यामुळे ती मेली तरी नरकांत जाणार नाही, पण मूल बाहेर येण्यापूर्वी त्याचा बाप्तिस्मा होऊं शकत नाही, तेव्हां तें त्यापूर्वी मेल्यास नरकांत जाअील, म्हणून मूल वांचवणेंच अधिक

महत्वाचें आहे. हा बाप्तिस्मा डोक्यावर ‘ पवित्र ’ पाणी ओतून करायचा असतो, तेव्हां कॅथोलिक सूतिकागृहांत मुलाच्या डोक्याला अतिशय महत्व प्राप्त होतें. डोकें फोडूनच मूल बाहेर काढावें लागत असेल, तर कॅथोलिक डाक्तराला तें करण्याची परवानगी नसल्यामुळें त्याने राजीनामा द्यावा, पण हें काम करणारा दुसरा डाक्तर कोठें मिळेल हें त्याने सांगितलें तरी चालतें. पण दुसरा कोणी डाक्तर मिळणें शक्य नसेल तर त्या बिचाऱ्या आओीने काय करावें, हें कोणीं सांगितलेलें नाहीं.

कॅथोलिक पुस्तकांत परिचारिकांना हुकूम केलेला आहे की मुलाचें डोकें दिसूं लागतांच त्यांनी त्याला ‘ पवित्र ’ पाण्यानें स्पर्श करावा, म्हणजे तें मूल तितक्यांत मेलेंच तर निदान त्याचा बाप्तिस्मा झालेला असेल. बाळंतपण कठिण असेल तर मूल बाहेर येईपर्यंत तिने वाट पाहूंच नये. डोकेंच प्रथम बाहेर येत आहे अशी खात्री नसली तरीही जें कांही दिसेल तें डोकेंच आहे असें समजून पाण्यानें स्पर्श करावा आणि ते डोकें नसल्यास नंतर मूल बाहेर आल्यावर जरूर तर डोक्याला पाणी लावावें. परिचारिका कॅथोलिक असेल तर मूल कॅथोलिक आओीबापांचें नसलें तरीही त्याच्या डोक्याला ‘ पवित्र ’ पाणी लावणें हें तिचें कर्तव्य आहे. पाणी नसेल तर बाप्तिस्मा करतां येणार नाही आणि पाणी फार नसलें तरी तें वहात आहे असें म्हणण्यापुरतें तरी असलें पाहिजे. पुढें मुद्दाम स्पष्टीकरण केलें आहे की दूध, फळांचा रस, तेल, किंवा अश्रू, लाळ, घाम वगैरे शरीरांतील द्रव पाण्याऐवजी चालणार नाहीत. बाप्तिस्मा न केलेल्या मुलाला स्वर्गांत जातां येत नसल्यामुळे त्याला ओीश्वराचें दर्शन होणार नाही, तेव्हां मुलाचा बाप्तिस्मा अत्यंत महत्वाचा आहे.”

———

# पत्रव्यवहार

## १

१. स्वैरसमागम मान्य असलेले व त्याप्रमाणें वागूं अिच्छिणारे बरेच तरुणतरुणी असतील असें मला वाटतें. तेव्हां अशा लोकांना अेकत्र आणून आपसांत विचारविनिमय करून त्याप्रमाणें वागण्यासाठीं अेखादा सोपा मार्ग सुचवाल काय? संततिनियमनाचीं साधनें असल्यामुळें घाबरण्याचें कारण राहणार नाहीं. २. आपल्या समाजरचनेमुळें व अितर वैयक्तिक कारणांमुळें समागम अितका कठिण झाला आहे की त्याचा साधा आणि सरळ मार्ग म्हणजे लग्न. कांही बिचारे अिच्छा नसतांना ह्याच कारणासाठीं लग्न करीत असतील. थोडक्यांत म्हणजे 'संसार करण्यासाठीं लग्न' म्हणण्यापेक्षां समागमाची कायमची सोय करण्यासाठीं लग्न, असें म्हणावें लागतें. तेव्हां ज्यांना आर्थिक परिस्थितीमुळें किंवा अितर कारणांमुळें लग्न नको असेल, त्यांची ही योजना शक्य झाली तर चांगलीच सोय होअील. ४. माझी प्रकृती साधारण बरी आहे, परंतु कांहीं काळ शक्ति वाढून व्यायाम केल्यामुळें छातीचा घेर वाढून अेकंदर प्रकृति सुधारते, पण नंतर अेकाअेकीं शक्ति कमी होऊन व्यायाम न करवल्यामुळें छाती दिवसेंदिवस बसकट होत जाते व कसलेंही शारीरिक वा मानसिक काम करण्याची शक्ति रहात नाहीं. असें हें शक्ति वाढणें, कमी होणें, पुन्हां वाढणें, पांच वर्षांपासून चालू आहे. शरीरप्रकृतींत (विशेषतः छातींत, फुप्फुसांत) कोणताही दोष नाही याबद्दल डाक्तरांचें अेकमत आहे. मग असें कां होतें? औषधें पुष्कळ घेतलीं, पण फायदा नाहीं. मला पांच वर्षांपूर्वी ब्रॉंकायटिस (फुप्फुसांचा विकार) झाला होता, तेव्हांपासून असें होतें. (आतां तो विकार नाही.) या विकाराचा कामवासनेशीं कांहीं संबंध आहे का? मला कामवासना अतिशय आहे. झोप फार चांगली लागते. नैसर्गिक समागमाने प्रकृति सुधारेल असें वाटतें. वेश्यां-

कडे जाणें पसंत नाही; लग्नही नाही. तेव्हां खरोखर प्रकृति सुधारेल काय ? आपला......

उ. १ व २. या बाबतींत आम्हाला कोणतीही योजना सुचवणें शक्य नाही. ३. हा प्रश्न गाळला आहे. ४. आपण तज्ञ डाक्तराचाच सल्ला घ्यावा, परंतु वर्णनावरून आपणास व्यायाम फारसा सोसत नाही असें दिसतें. 'कामवासना अतिशय आहे' आणि 'झोंप फार चांगलीं लागते,' या दोन विधानांचा मेळ बसत नाहीं ज्यांची कामवासना फाजील असते आणि तिला वाव मिळत नाही, त्यांना झोप चांगली लागत नाही. अेकंदरींत आम्हाला कोणताही उपाय दिसत नाही. **सं.**

## २

मी रेतनलिकांची शस्त्रक्रिया करून घेतली आहे, पण स्त्रीचें समाधान होत नाही अशी तक्रार आहे. याचें कारण काय ? कांही दिवसांपूर्वी शीघ्रपतन होत असे, पण गेल्या आठवड्यांत याच्या उलट अनुभव आला. यामुळें शस्त्रक्रिया करून फसलों की काय, अशी शंका येऊं लागली व उदासवाणें वाटूं लागलें. याला कांही उपाय असल्यास सुचवणें. शस्त्रक्रिया १९४३ सालीं करून घेतलीं. माझें वय ४६ व बायकोचें ३७ आहे. शस्त्रक्रियेमुळें संभोगांत कांही कमतरता येत नाही असें वाचण्यांत आलें, पण प्रत्यक्ष अनुभव वेगळा. अितरांस सावध करावें. आपला.......

उ. हा शस्त्रक्रियेचा परिणाम नव्हे. ही शस्त्रकिया करून न घेतलेल्यांनाही हे प्रकार होतात. पूर्वी होत नव्हते आणि आतां होतात, हें पुरेसें नाही, कारण शस्त्रकिया करून घेतल्याला पांच वर्षें झालीं, आणि वयाचाही परिणाम होतो हें आपण विसरतां. अर्थात् ४६ म्हणजे म्हातारपण नव्हे, पण या बाबतींत कोणताही सामान्य नियम नाही. कामशक्ति वयांत येण्याचे सुमारास सर्वांत जास्त असते, पुढें कमी होत जाते. व्यक्तिपरत्वें ती कमजास्त टिकेल. शस्त्रक्रिया करून घेतलेले आज हजारों लोक आहेत, त्यांचा अनुभव तसा

नाही. उलट शस्त्रक्रियेनंतर समागमशक्ति वाढल्याचीं उदाहरणें आहेत. तेव्हां अेकाच्या अनुभवाने अितरांनी घाबरण्याचें कांहीच कारण नाही. **सं.**

३

मेच्या अंकांत पिचकारीनें स्त्रियांचे गर्भाशयांत रेत घालून औरस संतति निर्माण करतां येते असें लिहिलें आहे. तरी याबाबत पुढील शंकांचें निरसन कराल अशी आशा आहे. १. रेत आयत्या वेळीं काढून घेतात कीं अगोदर काढून ठेवलेलें असतें? २. ज्या पुरुषांचें रेत घेऊन संतति निर्माण केली जाते, त्याचे आनुवंशिक गुण संततींत उतरतात काय? ३. पुरुषांना जर स्वस्त्रीकडून पिचकारीने औरस संतति निर्माण करतां येतें, तर स्त्रियांना का करतां येऊं नये? ४. वरीलप्रमाणें मूल करून घेऊन अेखाद्या विधवेने आपल्या नवऱ्याचें नांव लावलें तर त्याला औरस मूल म्हणण्यास काय-द्याची हरकत येअील काय? स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार आहे तर अशी संतति करण्याचा कां नसावा? ५. वरीलप्रमाणें कृति करतांना मानसिक व्याभिचार होणें शक्य आहे, त्यापेक्षा स्त्रीस पसंत असलेल्या पुरुषापासून औरस संतति निर्माण केल्यास दोघांचेंही समाधान होअील, व आपल्या धर्मांत पूर्वी नियोगपद्धतीने दहापर्यंत मुलें करून घेण्याची परवानगी होतीसें कांही ग्रंथांवरून दिसतें. तर अशीं मुलें स्त्रीने करून घेतल्यास तिला अधर्मी कां म्हणावें? आपला **५०१.**

**उ. १.** मेच्या अंकांत 'औरस' हा शब्द नाही. जर रेत नवऱ्याचें असेल, तरच संतति औरस म्हणतां येअील, अेरवीं नाही. रेत आयत्या वेळींच घ्यावें लागतें. २. अर्थात् ज्या पुरुषाचें रेत असेल त्याचे गुण संततींत उतरतील. ३. पाहिजे त्या पुरुषाचें रेत घेतल्यास संतति औरस होत नाही. ४. कायद्याची हरकत अलबत येअील. ५. नियोगपद्धतींत देखील स्त्रीला पसंत असलेल्या पाहिजे त्या पुरुषापासून संतति करून घेण्याचा हक्क नव्हता. दिराकडून, किंवा नवऱ्याने परवानगी दिलेल्या पुरुषाकडूनच संतति करून घ्यावी लागत

होती. स्त्रीच्या मर्जीवर कांहीं नव्हतें. धर्माचे बाबतींत बुद्धिवाद चालवतां येत नाही. कलियुगांत नियोगाची पद्धत वर्ज्य आहे, असें कोणीतरी शहाण्याने लिहिलें आहे, म्हणून ती धर्मबाह्य आहे. **सं.**

४

जूनच्या अंकांत ' मानवी रक्ताचे प्रकार ' या लेखांतील ' आर्. अेच्. फॅक्टर ' याचा अर्थ नीटसा कळत नाही. तोही अे व बी सारखा अेखादा पदार्थ आहे की काय हें स्पष्ट करावें. आपला ...

**उ.** आपण तो लेख पुन्हा वाचल्यास त्यांत ' आर्. अेच्. फॅक्टर ' हा अे व बी पेक्षा वेगळा पदार्थ आहे असें स्पष्ट सांगितलें आहे हें आपल्याला दिसेल ( पान २७६, ओळ ६ ) **सं.**

---

# शारदेचें पत्र

' किर्लोस्कर ' च्या अेका अंकांत अशी माहिती दिली आहे की भूक बंद करण्याकरतां अेकाने अेका औषधाचा शोध लावला आहे. शास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने जितके नवीन शोध लागतील तितके चांगलेच, पण अशा औषधाचा उपयोग कोणाला होअील ? जनतेवर वजन पाडण्याकरतां ज्यांना उपास करायचे असतात, त्यांना त्रास न होतां उपास करतां यावा म्हणून उपयोग होअील. अन्नाशिवाय राहण्याचा प्रसंग अेखाद्यावर अपघातानेच येतो, किंवा दुष्काळांत कदाचित् अनेकांवर येअील. अेरवीं भिकाऱ्यांवर देखील उपाशीं मरण्याचा प्रसंग हिंदुस्थानांत तरी येत नाही. पण अपघाताचे वेळीं हें औषध कोणाजवळ असेल असें नाही. भुकेअैवजीं दारू पिण्याची अिच्छा नाहीशी होअील असें औषध कोणी काढल्यास दारूबंदीच्या काळांत व्यसनी लोकांना उपयोग होण्याचा संभव आहे, असें त्याच मासिकांत सुचविलें आहे.

भूक ही मेंदूंतल्या अेका विशिष्ट भागावर अवलंबून असते आणि त्या भागावर या औषधाचा परिणाम होतो असें सांगितलें आहे. वास्तविक भूक ही पोटाच्या आकुंचनाने लागते असें म्हणतात, पण अर्थातच त्याची जाणीव मेंदूच्या विशिष्ट भागाला होत असेल. पण दारू, अफू, गांजा, चहा, चिरूट, या सर्व पदार्थांकरतां जर मेंदूचे निरनिराळे भाग वांटून द्यावे लागले तर अनवस्थाप्रसंग येअील. शिवाय ज्यांना दारूपासून किंवा चिरुटापासून सुख मिळत असेल, ते लोक अशीं औषधें जाणून बुजून कां घेतील? अर्थात् सुख जितकें कमी करावें तितकी स्वर्गप्राप्ति लवकर होअील असें ज्यांना वाटत असेल ते असे उपाय करतील. पण अशा रीतीने जर हे सर्व पदार्थ सोडण्याचे सोपे उपाय सांपडले, तर दुःख भोगल्याने जें पुण्य लागायचें तें लागणार नाही. मग स्वर्गप्राप्ति कशी होणार?

विश्वासराव डावऱ्यांनीं साने गुरुजींवर आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल जी फिर्याद करायला लावली, ती जरी यशस्वी झाली नाही तरी हा मुद्दा अेकदां लोकांपुढें यायला पाहिजेच होता. हायकोर्टांतल्या न्यायमूर्तींनीं 'आत्महत्येची तयारी' आणि 'आत्महत्येचा प्रयत्न' यांत फरक करून, तयारी हा गुन्हा नाही असें ठरवून, आरोपीला निर्दोष ठरवलें. बरें झालें, नाहींतर गांधीजींनी घालून दिलेल्या उपोषणाच्या प्रथेला जर गुन्हा ठरवला असता तर मोठी पंचाअीत झाली असती आणि प्रसिद्धि मिळवण्याचा अेक मार्ग अजीबात बंद झाला असता. पण माझ्या मतें यांत अेक दोष राहिला आहे. मी प्राणांतिक उपोषण करणार आहें, असें जाहीर करून कांही दिवसपर्यंत तो चालू ठेवणें हा जर गुन्हा नाही, तर मग अेखादा मनुष्य खरोखरच मॅक्स्वीनीसारखा उपोषण करून मेला, तर अशा वेळीं उपोषणाचे किती दिवस गुन्ह्याची तयारी समजायची आणि कोठून पुढें प्रयत्न समजायचा, हे न्यायमूर्तींनी स्पष्ट करायला पाहिजे होतें. शेवटच्या क्षणापर्यंत जर तयारी समजली, तर शिक्षा करण्याची संधिच सांपडणार नाही. माझ्या मतें हा मुद्दा महत्वाचा आहे आणि त्याचा अजून निकाल झाला नाही. मला वाटतें सरकारने या बाबतीं-

तला कायदाच बदलला पाहिजे. गांधींजींनी घालून दिलेल्या पवित्र प्रथेला गुन्हा समजण्याचा धोका अजीबात नाहीसा करण्याकरतां उपोषणानें जीव देण्याचा प्रयत्न हा गुन्हाच नव्हे, असा एक अपवाद कायद्यांत घालावा, म्हणजे गांधीजींचा अपमान टळेल.

आमच्या अरेराव सरकारने सुरक्षा कायद्याला जी नवीन पुस्ती जोडली आहे, तिचा दुरुपयोग करणार नाही असें ठराविक आश्वासन जरी दिलें होतें, तरी त्याचा दुरुपयोग प्रत्यक्ष होत आहे. अेखाद्या पत्रांत अेखादी खोटी बातमी आली तर तिचा सरकारने केलेला अिन्कार छापलाच पाहिजे, असा दंडक या कायद्यांत आहे, पण ‘ या बातमीचा सरकारने अिन्कार केला आहे,’ अितकेंच छापून सरकारचें समाधान होत नाही. त्यांत सरकारचें नांवच न आणतां आणि ती खोटी असल्याचा कांहींही पुरावा नसला तरी, ‘आम्ही छापलेली बातमी खोटी आहे आणि ती छापल्याबद्दल आम्ही सरकारची माफी मागतों’ असें छापण्याचे हुकूम हें सरकार सोडीत आहे. ही शुद्ध अरेरावी आहे. ‘ सरकार या बातमीचा अिन्कार करीत आहे ’ अितकें छापायला कोणीही संपादक तयार असतो, कारण सरकार म्हणेल तें खरेंच असतें असें कोणालाच वाटत नाहीं. उलट संपादकापेक्षां सरकारच खोटें बोलण्याचा संभव अधिक, कारण राजकारणांत खोटें बोलावेंच लागतें, हें सर्वांनांच कळतें. बरें, हा सरकारचा हुकूम मान्य केला नाही, तर सरकार कांहीतरी भरमसाट रकम जामीन मागून, कांही दिवसांनीं तो जामीन जप्त झाला, आतां आणखी दसपट जामीन भरा, असाही हुकूम काढतें. हें लोकांचेंच सरकार आहे, तेव्हां लोकांवर जुलूम करायचा हक्क त्याला आहेच, असेंही म्हणणारे लोक भेटतात !

नाही म्हणायला एक उत्तम गोष्ट या सरकारने नुकतीच केली आहे, ती म्हणजे सिनेमांत विडी ओढण्याची बंदी ही बंदी. दारूबंदीच्या जातीची नाही. सिनेमासारख्या ठिकाणीं मोकळी हवा खेळत नसते, अशा ठिकाणीं धूर कोंडतो,

आणि इतरांना घाण येते हा प्रश्न सोडला तरी कित्येकांना विडीच्या धुरापासून अपाय होतो हें कोणताही डाक्टर सांगूं शकेल. डाक्तर अशा लोकांना विडी ओढण्याची मनाई करतात, पण इतरांच्या विड्यांचा धूर नाकातोंडांत गेला तरी अपाय होतोच. शिवाय अशा धुरकट हवेंत चित्रही नीटसें दिसत नाही. अशा बंद ठिकाणीं विडी ओढण्याची मनाईच केली पाहिजे. अर्थात् विडी ओढणारांना हा अन्याय वाटतो, कारण त्यांना दुसऱ्याची फारशी परवाच नसते. आपल्या विडीनें कोणाचा हात भाजला, तरीही त्यांना कांही लाज वाटत नाही, आणि 'अरे, लागली का तुम्हाला ?,' असें म्हटलें म्हणजे शिष्टाचारालाही बाध येत नाही अशी त्यांची कल्पना असते. खरा शिष्टाचार म्हणजे दुसऱ्याला त्रास होणार नाही अशी दक्षता बाळगली पाहिजे. कोणाला लाथ लागली तर लागली, मागून 'माफ करा हां,' म्हटलें म्हणजे झालें, अशा बेपरवाईला कोणी शिष्टाचार म्हणत नाही.

कृष्णराव मराठ्यांची नेमणूक सेन्सर बोर्डावर झाल्यापासून ते फारच शेफारले आहेत असें दिसतें. स्नान, संध्या आणि भस्माच्या पट्ट्यांबद्दल प्रसिद्ध असलेले प्रि. घारपुरे देखील त्यांना सामील आहेत असें दिसतें. मी नुकतेंच वाचलें की त्यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याच्या संस्कृतिसंरक्षक मंडळाची नुकतीच सभा होऊन तींत असें ठरलें की बोलपटांप्रमाणेंच ललित वाङ्मयालाही कात्री लावण्याचा अधिकार कृष्णराव मराठ्यांना द्यावा अशी विनंति सरकारला करावी. मुरारजी देसाई हेही त्यांच्याअितकेच सोंवळे असल्यामुळेंच त्यांची नेमणूक सेन्सर बोर्डावर झाली. ही देसाई-मराठे युति आणखी काय काय अनर्थ करणार आहे कांही समजत नाही. सरकार आमचें आहे, तेव्हां वाटेल तो जुलूम करण्याचा त्याला अधिकारच आहे, हें सरकारच्या बगलबच्च्यांचें उत्तर ठरलेलेंच. लेखणींत तरवारीपेक्षा जास्त शक्ति असते असें लोक बोलतात, पण लेखण्या मोडण्याचें सामर्थ्य सरकारला आहे, त्यापुढे लेखण्यांचें काय चालणार ?

रामजोशी पाहिलास का तूं? अेकंदरींत चित्र बरें झालें आहे, निदान पहिला भाग बरा आहे. पण त्यांत अनेक प्रकारांनी लोकांची दिशाभूल केलेली आहे. अेकतर जाहिरातींवरून लोकांना असें वाटतें की यांत या लोकप्रिय शाहिराचा गौरव असेल, पण पहावें तों सगळेंच उलटें! त्याचा अेकंदर सारांश असा आहे की तो तमासगिरांच्या नादीं लागल्याने सर्वस्वी बुडाला, दारूच्या पायीं त्याचा नाश झाला, आणि शेवटीं मोरोपंताच्या उपदेशानें तो आपल्या कवित्वाचा लावण्या लिहिण्यांत दुरुपयोग करायचा सोडून देऊन त्याचा सदुपयोग करूं लागला. म्हणजे काय? तमाशाअैवजी भजनकीर्तनाच्या नादीं लागला. याला सदुपयोग म्हणणें ही सर्वांत मोठी दिशाभूल. शांतारामना कदाचित् टाळकुटेपणा हा मोठा उत्तम गुण वाटत असेल. पण हा मूर्खपणाच नव्हे का? अशी शिकवण देऊन का कोणाचें हित होणार आहे? आपल्याला आतां पंढरीचे वारकरी का पाहिजे आहेत? दुसरी गोष्ट अशी की रामजोशी दारूच्या पायीं सर्वस्वी बुडाला ही अेक लोणकडी थाप आहे. सरकारला खुष करण्याकरतां केलेला हा दारुबंदीचा प्रचार आहे. या प्रचाराकरतां थापा द्याव्या लागतात हें मला माहीत आहे. दारूला स्पर्श करणें देखील भयंकर आहे असें गडकरी सांगतात. वास्तविक अितके दुबळे जे लोक असतात, ते दारूच्या पायीं न बुडाले तर दुसऱ्या अेखाद्या रीतीनें बुडतील. सरकारला वाटतें की दारूबंदी केली की सर्व व्यसनें नाहीशीं झालीं. अर्थात् त्याचबरोबर भांग, गांजा, अफू, वगैरे देखील बंद केलीं म्हणून काय झालें? लोक चोरून दारू तयार करतील हें वेगळें, पण व्यसनें काय अेवढींच आहेत? सगळीं व्यसनें सरकार बंद करूं शकत नाही. आणि या बोलपटांत तर रामजोशाची दारूबाजी ही केवळ लेखकाची थाप आहे. चित्रावशास्त्र्यांच्या चरित्रकोशांत 'तो मद्यही पीत असे' असें वाक्य आहे. याचा अर्थ तो दारूबाज होता असा नव्हे, हें कॉंग्रेसवाल्यांना कळलें नाही तरी अितरांना खास कळेल. त्याच्या लावण्यांच्या पुस्तकांत अितकेंच म्हटलें आहे की तो शाक्त असल्यामुळे मद्य घेत असे, पण तो दारूबाज होता

असें कोठेही सांगितलेलें नाही. सरकारनें शांतारामना या प्रचाराबद्दल किती रकम दिली असेल कोणाला माहीत! ही केवळ लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकलेली आहे. हा शाहिराचा गौरव नव्हे, उपमर्द आहे. रामजोशाचे कोणी वंशज असतील तर त्यांनी शांतारामवर फिर्याद केली पाहिजे. पात्रांची निवड करण्यांत शांताराम कुशल आहेत अशी समजूत आहे, पण याच चित्राच्या हिंदी आवृत्तीकरतां त्यांनीं शिलेदारऐवजीं जो मनुष्य रामजोशाच्या कामाकरतां घेतला आहे, तो अितका बावळट आहे की त्याच्याकडे पाहवत नाही. शिवाय त्यांत रामजोशाचें काव्यही नाही. सगळ्या चाली बदलून बोलपटाची घाण केली आहे. अेकंदरींत हिंदीपेक्षां मराठींतच जोर जास्त आहे अशी माझी खात्रीं झाली. बाकीचीं सगळीं पात्रें कायम ठेवून शिलेदारलाच कां बदलला कोणाला ठाऊक? अेकंदरींत तारतम्य नाही हें खरें.

तुझी **शारदा**

---

# जर्मनींत गर्भपाताची भयंकर वाढ

हल्लीच्या भयंकर आर्थिक परिस्थितीमुळें जर्मनींतील बायकांना संतति उत्पन्न करण्यास भीति वाटते आणि यामुळें त्या बेकायदा गर्भपाताकडे वळतात, अशी माहिती गेल्या आगस्टमध्यें अिंग्लंडांत भरलेल्या आंतरराष्ट्रीय कुटुंबनियोजन परिषदेंत दोन जर्मन डॉक्टरांनी सांगितली. त्यांनी स्वतंत्र देशांना विनंति केली की त्यांनी जर्मनींत संततिनियमनाचीं साधनें व माहिती पाठवावीं. हल्लीं फक्त गल्ल्याकुच्यांतल्या केशकर्तनालयांत हीं बेकायदा साधनें विकत मिळूं शकतात, असेंही त्यांनी सांगितलें. डॉ. लांगेनहाअिन म्हणाले की हॅम्बर्ग येथील अेका सूतिकागृहांत गेल्या वर्षी आलेल्या स्त्रियांत बेकायदा गर्भपात आणि बाळंतपणें यांचें प्रमाण अेकास दोन असें होतें. हेंच प्रमाण १९४२ सालीं अेकास वीस होतें. हिटलरच्या कमाल प्रजोत्पत्तीच्या मोहिमेविरुद्ध लढलेल्या डॉ. मारी-वेव्हर यांनी सांगितलें, 'आम्ही हल्ली कायदा बदलून वैद्यकीय कारणांबरोबरच सामाजिक कारणांकरतांही गर्भपातास

कायद्याने तात्पुरती परवानगी द्यावी असा आग्रह धरीत आहेंत.' नियंत्रण-समितीच्या वतीने अेका वक्त्यानें सांगितलें की सध्या या साधनांची कमतरता असली तरी तीं विपुल प्रमाणांत पुरवण्याचा खर्च ब्रिटिश जनतेने सोसला पाहिजे. ('संडे स्टॅंडर्ड' वरून)

नीतिबाजीचे हे ठरलेले परिणाम आहेत. आमच्या सनातनी सरकारला ते अर्थातच दिसणार नाहीत. दारूबंदीचे अमेरिकेंत झालेले भयंकर परिणाम माहीत असूनही जे येथे दारूबंदी करीत आहेत, ते या बाबतींत तरी कां मागें सरतील? झोंपी गेलेल्याला जागें करतां येतें, पण हट्टाने डोळे मिटून घेणाराला जागें करण्यास उपाय नाही.

---

अमेरिकेंतील प्रसिद्ध नास्तिक कर्नल अिंगरसॉल यांची नालस्ती करण्याकरतां अेका क्रिस्ती साप्ताहिकाने पुढील मजकूर छापला होता. "आम्हास खात्रीलायक समजतें की कर्नल अिंगरसॉल यांच्या अेकुलत्या मुलाला कादंबऱ्या वाचण्याचा अतिशय नाद होता आणि याचा त्याच्या मनावर परिणाम होऊन त्याला वेड लागलें आणि त्याला गुपचुप अेका खाजगी अिस्पितळांत नेऊन ठेवलें होतें आणि तेथे तो लवकरच मेला." हें कातरण अेका स्नेह्याने अिंगरसॉलकडे पाठवलें असतां त्यांनी उत्तर लिहिलें की १. माझ्या अेकुलत्या मुलाला कादंबरी वाचण्याचा नाद नव्हता, २. त्याला वेड लागलें नाही, ३. त्याला अिस्पितळांत नेलें नाही, ४. तो मेला नाहीं, आणि ५. मला मुलगाच नव्हता!

---

अेका आरबी कवीने म्हटलें आहे की म्हाताऱ्या माणसाला अत्यंत हानिकारक गोष्टी म्हणजे तरुण बायको आणि उत्तम स्वयंपाकी!

---

हायून नांवाच्या जर्मन विद्वानाने लिहिलें आहे की धर्म आणि ढोंग या जुळ्या बहिणी आहेत आणि त्या अितक्या सारख्या आहेत की त्या अेकमेकींपासून ओळखणें कठिण जातें.

# स मा ज स्वा स्थ्य

## वर्गणीची माहिती

हें मासिक दर १५ तारखेला प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी तीन रुपये, व्ही. पी. ने सवातीन. पोर्तुगीज प्रांतांत किंवा परदेशीं व्ही. पी. नाही. हिंदुस्थानाबाहेर साडेतीन रुपये किंवा पांच शिलिंग. मनीऑर्डर केल्यास चार आणे वांचतील. अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हास मिळाली पाहिजे. पुणें येथील ग्राहकांनी ६९–१, लॉ कॉलेज रोड, येरंडवणें, येथें वर्गणी भरल्यास चालेल.

**राअिट अेजन्सी,** १३ नवी भटवाडी, **मुंबई ४**



# आमचेकडे मिळणारा माल

**लॅम्बट डच कॅप,** आकार ५५ ते ७५, प्रत्येकीं — रु ५

**उभट कॅप** ( देशी ) लहान, मध्यम किंवा मोठी, — रु. १॥

**राअिट कॉंट्रसेप्टिव्ह जेली,** — रु. ३॥

**पुरुषांकरतां पिशव्या,** — ४ आणे, ८ आणे, १ रुपया

**कषायचूर्ण,** ( योनिमार्ग धुण्याकरतां ) — बाटलीस अडीच रुपये

**राअिटयूब,** ( रोगप्रतिबंधाकरतां ) — १४ आणे

**जेलोटयूब** (फ्रेंच, रोगप्रतिबंधाकरतां), २ नळ्यांचे पेटीस दोन रुपये

**राअिट अेजन्सी,** १३ नवी भटवाडी, **मुंबई–४.**

Registered No. B 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु, ट. ख, ६ आणे.

२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], चौथी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ७ आणे

३. संततिनियमन [सचित्र], ९ वी आ. १। रु ट.ख. ५आ.

४. गुप्त रोगांपासून बचाव, ४ थी आ. रु १, ट.ख.५आणे.

५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४–५–६], किं. २–०–०, ट.ख.६आ.

६. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ५ आ.

७. गुरुबाजी (नाटक) किं. ८ आ., ट. ख. ५ आणे

८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ६ आ.

९. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ५ आ.

१०. न्यायाचा शोध ( नवीन सामाजिक नाटक )
किंमत १ रु., ट. ख. ५

११. पॅरिसच्या परी, किं. ३ रु., ट. ख. ६ आणे.

डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५आ.

२. मूळव्याध. किं. ४ आ.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई–७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई–४